दैनिक महासत्ता

गुरुवार, ता.३० ऑक्टोबर २०२५

# अजय जाधवची आंतरविभागीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

वारणानगर, ता.२९ (प्रतिनिधी)–

................................

**कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषद अंतर्गत आयोजित शिवाजी विद्यापीठ विभागीय जलतरण स्पर्धेत २०० मीटर बटर फ्लाय व २०० मी ब्रेस्ट स्ट्रोक या प्रकारात तळसंदे (ता.हातकणंगले) येथील अजयराज जाधव याने तृतीय स्थान मिळवले आहे. या यशामुळे आंतरविभागीय जलतरण स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.**



राजर्षी छ.शाहू कॉलेज कोल्हापूर येथे या स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेसाठी देवचंद कॉलेज अर्जुननगर, डीकेटीई इचलकरंजी, घाळी कॉलेज गडहिंग्लज, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय.पाटील इंजिनिअरिंग कॉलेज साळोखेनगर, शाहू कॉलेज, डी. वाय.पाटील टेक्निकल कॅम्पस तळसंदे आदी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये २०० मी बटर फ्लाय व २०० मी ब्रेस्ट स्ट्रोक या खेळ प्रकारात डी.वाय.पाटील टेक्निकल कॅम्पसमधील विद्युत अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षात शिकत असलेला अजयराज जाधव याने तिसरा क्रमांक मिळवत राजर्षी छ. शाहू कॉलेज कोल्हापूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय जलतरण स्पर्धेसाठी पात्र झाला. डी. वाय. पाटील टेक्निकल विभागीय संचालक डॉ.सतिश पावसकर यांनी अजयराज जाधव आणि जिमखाना प्रमुख विनोद उतळे यांचे अभिनंदन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी.पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज उर्फ बंटी डी.पाटील, विश्वस्त माजी आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, विश्वस्त तेजस पाटील, संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ.ए.के.गुप्ता यांचे प्रोत्साहन लाभले.

31.10.25

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५

# ‘पुरुषोत्तम करंडक’ स्पर्धा उद्यापासून

## २४ एकांकिका; देवल क्लबमध्ये प्राथमिक फेरी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : महाविद्यालयीन कलाकारांसाठीच्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला शुक्रवार (ता. ३१) पासून प्रारंभ होणार आहे.

महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे), देवल क्लब, शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार आहे. देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात रसिकांना सलग तीन दिवस २४ एकांकिकांची पर्वणी मिळणार आहे.

### स्पर्धेतील एकांकिका अशा...

**शुक्रवारी (ता. ३१) सकाळी नऊपासून**

- श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी (मागे वळून बघू नकोस)
- भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालय (हमको हिंदी नाही आती!)
- राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर (एका लेखकाची अर्धवट राहिलेली गोष्ट)
- नाईट कॉलेज, इचलकरंजी (तमाशा)
- विवेकानंद कॉलेज (लेबल)

**सायंकाळी चारनंतर**

- डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज (सवारी भवानी चौकामध्ये)
- कर्मवीर भाऊराव पाटील मॅनेजमेंट स्टडिज अँड रिसर्च, सातारा (नवरा नको गं बाई)
- आर्टस्‌ व कॉमर्स महाविद्यालय, नागठाणे (सोयरिक)
- गोविंदराम सक्सेरियन विज्ञान महाविद्यालय, बेळगाव (असं हे असे लिहावे)
- डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निक (गरम चाय की प्याली)
- राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर (हाफवे)



**शनिवारी (ता. १) सकाळी नऊपासून**

- न्यू कॉलेज (घरोटं)
- आजरा महाविद्यालय (आर या पार)
- भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय (एक डॉट)
- शहाजी लॉ कॉलेज (अर्थाच्या शोधात)
- कॉमर्स कॉलेज (ग्वाही)

**सायंकाळी चारनंतर**

- डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (इ दिनगुलिओ केते जाबे)
- पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट, बुधगाव (स्काय वॉक)
- चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, सांगली (अव्यक्त)
- डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग (मिठाई)
- दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी (कूपन)
- शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग (अ युजलेस जीनिअस)

**रविवार (ता. २) सकाळी नऊपासून**

- दत्ताजीराव कदम आर्टस्‌, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी (घबाड)
- डी. वाय. पाटील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर (फितूर तो चंद्र)
- डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालय, कोल्हापूर (पँडल)
- संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (अस्तित्व)

31.10.25